**प्रेसनोट**
**पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचेकार्यालय,**
**बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस जवळ,**
**पुणे-४११००६**

**जा.क्र./पोउआ/वाह/७०८७/२०२३** **पुणे दिनांक - ०५/१०/२०२३**

पुणे शहरातील कोरेगाव पार्क वाहूतक विभागांतर्गत वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सीआर - ३७/टीआरए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी विजयकुमार मगर, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक, पुणे शहर, कोरेगाव पार्क वाहतुक विभागातील खालील नमुद रस्त्यांवर तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे. यापुर्वी या ठिकाणी काही निर्बंध असतील ते रद्द करण्यात येत आहेत.

**येरवडा, मुंढवा, कोरेगाव पार्क वाहतुक विभाग पुणे अंतर्गत,**

१. पुणे - अहमदनगर रोडवरुन शास्त्रीनगर चौक व रामवाडी चौक येथुन आगाखान पुल मार्गे कोरेगाव पार्क व मुंढवाकडे येणारी व जाणारी जड वाहने
२. कोरेगाव पार्क परिसरातून साऊथ मेन रोड,नॉर्थ मेन रोड व बर्निंग घाटरोड वरुन एबीसी फार्महाऊस चौक मार्गे कल्याणीनगर व मुंढवा कडे येणारी व जाणारी जड वाहने
३. ताडीगुत्ता चौकामधुन नॉर्थ मेन रोड कोरेगाव पार्क कडे येणारी व जाणारी जड वाहने

एक टन व त्यापेक्षा जास्त वाहन क्षमता असलेली सर्व प्रकारची माल वाहतूक करणारी वाहने यांना दररोज सकाळी ०८/०० ते १२/०० वा व सायंकाळी १६/०० ते २३/०० वा पर्यंत प्रवेश बंद करण्यात येत आहे.

तरी नागरीकांनी याबाबत आपल्या काही सुचना असल्यास त्या पोलीस उप-आयुक्त, वाहतूक नियंत्रण शाखा, येरवडा पोस्ट ऑफीस, बंगला नं-६ जेल रोड पुणे ४११००६ यांचे कार्यालयात दिनांक – ०६/१०/२०२३ ते दिनांक– २०/१०/२०२३ पर्यंत लेखी स्वरूपात कळवाव्यात. नागरीकांच्या सूचना व हरकती विचार करुन व अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहीका, इ.) खेरीज करून अंतिम आदेश काढण्यात येतील.

**(विजयकुमार मगर)**
पोलीस उप-आयुक्त ,वाहतूक
पुणे शहर